महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैंनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ १० मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३११ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**प्रतिनिधी हवे आहेत**

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी प्रतिनिधी नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१


### भारत-पाक तणावाच्या पार्श्वभूमीवर

# मुख्यमंत्र्यांकडून राज्यातील सुरक्षा सज्जतेचा आढावा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई, ९ मे : भारत आणि पाकिस्तानातील तणावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील एकूणच सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते. मॉकड्रिल, ब्लॅकआऊट इत्यादी सर्वच बाबतीत समग्र आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विविध दिशानिर्देश दिले. प्रभारी मुख्य सचिव राजेशकुमार, राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गृहविभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले निर्देश

■ प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करा आणि जिल्हा स्तरावर वॉर रुम स्थापित करा.

■ ब्लॅकआऊटवेळी हॉस्पिटलसोबत समन्वय यंत्रणा उभी करा. टार्गेट होऊ नये म्हणून लाईट बंद केले जातात, त्यामुळे पर्यायी विद्युत व्यवस्थेद्वारे यंत्रणा सुरू ठेवून, गडद रंगाचे पडदे अथवा गडद रंगाच्या काचा वापरुन त्याचवेळी बाहेरुन लाईट दिसणार नाही, अशी व्यवस्था करा.

■ ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे, यांचे व्हिडिओ विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचवा. व्यापक जनजागरण करा.

■ केंद्र सरकारच्या 'युनियन वॉर बुक' चे सखोल अध्ययन करीत सर्वांना त्याची माहिती द्या.

■ प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करा. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करा.

■ प्रत्येक जिल्हाधिकारी यांना आपत्कालीन फंड आजच देणार, ज्यातून काही तातडीच्या साहित्याची खरेदी करायची असतील तर ती तत्काळ करता येईल. याव्यतिरिक्त कोणताही महत्वाचा प्रस्ताव यासंदर्भात आला तर तो 1 तासात मंजूर करा.

■ एमएमआर क्षेत्रातील सर्व महापालिकांची बैठक घ्या, त्यांनाही 'ब्लॅकआऊट' बाबत जागरूकता निर्माण करण्यास सांगा. यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना सहभागी करून घ्या.

■ पोलिस विभागाने नेहमीपेक्षा जास्त जागरूकता ठेवावी. देशद्रोही व्यक्तींच्या कारवाया वाढण्याची शक्यता पाहता अधिक कोंबिंग ऑपरेशन करा आणि गस्त अधिक चोख करा.

■ सैन्याच्या तयारी संबंधित गतिविधीचे चित्रिकरण करणे आणि ते समाजमाध्यमांवर प्रसारित करणे हा गुन्हा आहे, त्यावर तत्काळ गुन्हे दाखल करा.

■ सागरी सुरक्षा वाढविण्यासाठी आवश्यकतेनुसार फिशिंग ट्रॉलर्स भाड्याने घ्या

■ नागरिकांना परिस्थितीबाबत अद्ययावत व खरी माहिती पोहोचवणे यासाठी शासनाकडून व्यवस्था उभी करा.

■ शासनाच्या अतिमहत्वाच्या पायाभूत सुविधा (उदा. विद्युतनिर्मिती, वितरण) यावर सायबर



हल्ले होण्याची शक्यता लक्षात घेता सायबर विभागाकडून त्वरित सायबर ऑडिट करून घ्या

■ सरकार आणि सुरक्षा यंत्रणा यात अधिक समन्वयासाठी मुंबईतील सैन्याचे तिन्ही दल तसेच कोस्टगार्डच्या प्रमुखांना पुढील बैठकीत व्हीसी माध्यमातून निमंत्रित करा.

## थोडक्यात महत्वाचे

# भिवंडी शहरात स्वामी समर्थांच्या पादुका पालखीचे आगमन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट अक्कलकोट यांनी दरवर्षी आयोजित करीत असलेल्या श्री स्वामी समर्थ पादुका पालखी महाराष्ट्रातील परिक्रमानिमित्त स्वामींच्या पादुका पालखीचे नुकतेच भिवंडीत आगमन झाले. या परिक्रमेस यंदा 28 वर्ष पूर्ण झाले आहेत. या पादुका पालखी आगमन सोहळ्याच्या निमित्ताने भिवंडी शहरातील कोंबडपाडा येथील स्वामीभक्त सुभाष (नाना) झळके यांच्या निवासस्थानी स्वामी पालखी पादुकांचे आगमन झाले. यावेळी पादुका पूजन व महाआरती महाप्रसाद सोहळा आयोजित करण्यात आला होता. स्वामी सेवा प्रचारक व प्रसारक मंडळ, भिवंडी या संस्थेतील सर्व सदस्यांनी कोंबडपाडा येथील स्वामी समर्थ निवास येथे दुपारी 11 ते 2 वाजेपर्यंत समस्त स्वामी भक्तांसाठी पादुका पालखी महाआरती दर्शन सोहळा आयोजित केला होता. स्वामीभक्त व भक्तगणांनी यावेळी मनोभावे पूजा विधी करून महाआरती केली आणि दर्शन, महाप्रसादाचा लाभ ही घेतला. यामध्ये भिवंडीतील स्वामीभक्त, भक्तगण, विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक इ.व्यक्ती उपस्थित होते. त्यानंतर स्वामींच्या पादुका दर्शनासाठी चाविंद्रा, कणेरी, ठाणगे आळी, अशा विविध ठिकाणच्या भक्तगणांच्या घरी नेल्यानंतर ब्राह्मणआळीतील श्री स्वामी समर्थ मंदिर मठात दर्शनासाठी ठेवण्यात आल्या होत्या. भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे, या स्वामी समर्थांच्या वाक्यानेच समस्त भक्तगण निश्चितपणे आपलं जीवन जगत असतात. हे वाक्य त्यांच्या भक्तगणामध्ये अत्यंत विश्वासदर्शक आणि शाश्वत मानले जाते. त्यामुळे भिवंडी व आजूबाजूच्या गावांमधील समस्त स्वामी भक्तांना हा पर्वणीचा दिवसच ठरला आणि भिवंडी तील स्वामीभक्त, भक्तगणांनी व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून हा पादुका पालखी सोहळा स्वामींच्या नावाचा गजर करीत आणि त्यांच्या जयघोषात आनंदी व समाधानी वातावरणामध्ये पार पडला. हा पालखी सोहळा पार पाडण्यासाठी स्वामीभक्त नाना झळके, विनायक शिंदे व स्वामी सेवा प्रचारक व प्रसारक मंडळ,भिवंडी यांच्या सर्व सदस्यांनी प्रचंड मेहनत घेतली.

# चंद्रकांत घाटाळ यांचा विज्ञानकथा संग्रह वाचकांच्या भेटीला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पालघर जिल्ह्यातील कासा गावचे रहिवासी, आदिवासी खगोल अभ्यासक आणि साहित्यिक अशी स्वतंत्र ओळख निर्माण केलेले श्री. चंद्रकांत घाटाळ यांचे सहावे पुस्तक लवकरच प्रकाशित होणार असून, ते विज्ञानकथांवर आधारित आहे. सध्या चर्चेचा विषय असलेल्या 'कृत्रिम बुद्धिमत्ता' (AI) या विषयावर आधारित या पुस्तकात अनेक विज्ञानकथा समाविष्ट असून, वाचकांना माहितीबरोबरच रहस्याचा आनंदही मिळणार आहे. हे पुस्तक समीक्षा प्रकाशन, पंढरपूर यांनी प्रकाशित केले असून, त्याची किंमत १२० रुपये आहे. या पुस्तकात लेखक परिचय लिहिण्याची जबाबदारी जव्हार महाविद्यालयाचे प्राध्यापक मा. सुधीर भोईर यांनी पार पाडली असून, त्यांनी विश्वास व्यक्त केला आहे की, या पुस्तकातील सर्वच कथा वाचकांना निश्चितच आवडतील. चंद्रकांत घाटाळ यांचे याआधी प्रकाशित झालेल्या 'डम्पी' या पुस्तकाला उत्कृष्ट विज्ञान साहित्य हा राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच 'बिन आडनावाची पोरी' या कथेला राज्यस्तरीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला होता. त्यांनी विज्ञान साहित्याबरोबरच सामाजिक, बालसाहित्य, विनोदी, रहस्यमय इ. प्रकारातही लक्षणीय लेखन केले असून त्यांचे साहित्य अनेक वाचकांच्या मनात घर करून आहे.त्यांच्या या नव्या पुस्तकासाठी वाचकांकडून उत्सुकता व्यक्त होत असून पुस्तकाचे प्रचंड प्रतीक्षा त्यांच्यामध्ये निर्माण झालेली आहे.


# समाज माध्यमांवरील 'योध्यांवर' जिल्हा प्रशासनाची करडी नजर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : भारताने दहशतवाद्यांविरोधात पाकिस्तान मध्ये केलेल्या सिंदूर ऑपरेशन नंतर दोन्ही देशांचे सीमेवर सशस्त्र संघर्ष सुरू झाला आहे. मात्र या बाबत सोशल मीडियावर सर्रास खोट्या बातम्या पसरत असल्याचे दिसून आले आहे. आता याच" सोशल मीडिया योद्धयांवर " जिल्हा प्रशासनाची करडी नजर असून भारत-पाक तणावाच्या संदर्भात चुकीच्या बातम्या पसरवणाऱ्या किंवा समाजात तेढ निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.



भारत-पाक सीमेवर वाढलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून ठाणे जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा सतर्क झाली आहे. जिल्ह्यातील नागरिकांना शांतता आणि सलोखा राखण्याचे, नागरिकांनी कोणत्याही परिस्थितीत घाबरून जावू नये आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे. ठाणे जिल्ह्यातील सतर्कतेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातही सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्यात आली आहे. जिल्ह्यातील संवेदनशील ठिकाणे, महत्वाच्या इमारती आणि गर्दीच्या ठिकाणी आवश्यक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. प्रशासकीय यंत्रणांनी जिल्ह्यातील विविध भागात मॉक ड्रील आयोजित करून कोणत्याही धोकादायक घटनेचा सामना करण्यासाठी तयारी ठेवली आहे. जिल्ह्यात कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास त्वरित पोलिसांना माहिती देण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तर सोशल मीडियावर प्रसारित होणाऱ्या अफवा आणि द्वेषपूर्ण संदेशांवर प्रशासनाकडून बारीक लक्ष ठेवले जात आहे. तसेच भारत-पाक तणावाच्या संदर्भात चुकीच्या बातम्या पसरवणाऱ्या किंवा समाजात तेढ निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. ठाणे जिल्हा प्रशासन आपल्या सुरक्षिततेसाठी कटिबद्ध आहे," असे जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील नागरिकांना आश्वस्त केले आहे.



# कल्याण मुरबाड रेल्वेमार्गासाठी प्रयत्नशील - खा. सुरेश म्हात्रे यांचे आश्वासन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : कल्याण-मुरबाड रेल्वे मार्गातील अडचणी दूर करून हा रेल्वे मार्ग लवकरात लवकर सुरू करण्यात यावा, या संदर्भात भिवंडी लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुरेश म्हात्रे यांनी संसदेच्या ३ फेब्रुवारी रोजी झालेल्या अधिवेशनात मुद्दा उपस्थित करून कल्याण-मुरबाड रेल्वे मार्गाचे रखडलेले काम लवकरात लवकर सुरू करावे अशी मागणी केली होती.

खासदार सुरेश म्हात्रे यांच्या मागणीची दखल केंद्रीय रेल्वे व खाद्य प्रसंस्करण उद्योग राज्यमंत्री रवनीत सिंह यांनी घेतली. या रेल्वे प्रकल्पासाठी ८३६.१२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून भूमी अधिग्रहण व इतर कामांना लवकरात लवकर प्रारंभ होणार असून या रेल्वे मार्गाचे काम मार्गी लागणार असल्याचे लेखी पत्र खासदार बाळ्या मामा यांना पाठवण्यात आले आल्याचे सांगून या प्रकरणी सर्व अडथळे दूर करून हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**कल्याण (आंबिवली) - मुरबाड (२८ कि.मी.) नवीन रेल्वे मार्ग प्रकल्पाच्या अनुषंगाने केंद्रीय रेल व खाद्य प्रसंस्करण उद्योग राज्यमंत्री मा. रवनीत सिंह जी यांचे पत्र प्राप्त झाले असून, त्यामध्ये योजनारचना, अंदाजपत्रक व जमीन संपादन यांसारख्या प्राथमिक कामांना गती देण्याचा उल्लेख आहे. या महत्त्वपूर्ण टप्प्यामुळे मुरबाड रेल्वेला गती मिळणार असून, मतदारसंघातील नागरिकांना लवकरच या प्रकल्पाचा लाभ मिळेल, अशी अपेक्षा आहे.**

**- खासदार सुरेश म्हात्रे**

# ठाणे पालिका घेणार ४३८ कोटींचं कर्ज



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे, ता. ९ : पालिका विकासकामांसाठी ४३८ कोटींचं बिनव्याजी कर्ज घेणार आहे. यासंबंधी पालिकेने केंद्र शासनाच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी प्रोत्साहनपर अनुदान या अंतर्गत हे कर्ज मिळावे यासाठी पत्रव्यवहारही केला आहे. यातून ठेकेदारांची शिल्लक देणी देण्यात येणार असून, नवीन विकासकामे करण्यात येणार असल्याची माहिती पालिका सूत्रांनी दिली. कोरोना महामारीपासून बिघडलेली आर्थिक स्थिती कशी सुधारता येईल, यावर पालिकेने भर दिला आहे. तसेच पालिकेवर असलेले दायित्व कमी करण्यासाठी उपाययोजना आखल्या जात आहेत. अशातच एकनाथ शिंदेंच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात ठाणे पालिकेला विविध विकासकामांसाठी राज्य शासनाकडून कोट्यवधींचा निधी प्राप्त झाला आहे. यामध्ये रस्त्यांच्या कामासाठी ६०५ कोटी, शहर सौंदर्गीकरण आणि रंगरंगोटी करण्यासाठी १४१ कोटी, त्याचबरोबर गटार पायवाटा, शौचालये याशिवाय विविध विकासकामेदेखील केली जात आहेत. घोडबंदर भागातही अनेक विकासकामे राज्य शासनाच्या निधीतून प्रस्तावित करण्यात आली आहेत.

पालिकेची आर्थिक स्थिती खालावल्याने पालिकेला आजही उत्पन्न आणि खर्चाचा ताळमेळ बसविता येत नसल्याचे चित्र आहे. तसेच विकास आराखड्यातील विविध रस्ते, युटीडब्ल्युटी व इतर भांडवली कामाचा देयके अदा करण्यासाठी पालिकेच्या तिजोरीत पैसे नसल्याने पालिकेने राज्य शासनाकडे १५ ते २० दिवसांपूर्वी भांडवली कामांची देयके अदा करण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा किंवा कर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी केली होती. अखेर पालिकेला तब्बल ११५ कोटींचे बिनव्याजी कर्ज मंजूर झाले होते. त्यानंतर आणखी कर्ज पालिकेला मिळाले असून, त्यानुसार आतापर्यंत २१३ कोटींचे कर्ज पालिकेला प्राप्त झाले आहे. त्यातून महापालिकेने केलेल्या विकासकामांचे ठेकेदारांची थकीत बिले अदा केलेली आहेत. दुसरीकडे आता महापालिका पुन्हा ४६८ कोटींचे बिनव्याजी कर्ज मिळविण्यासाठी शासनाकडे प्रयत्नशील आहे. त्यासाठी एप्रिल महिन्यात पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

# पाकड्यांशी लढताना मुंबईतील जवान मुरली नाईक यांना वीरमरण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : पाकिस्तानने शुक्रवारी पहाटे केलेल्या ड्रोन हल्ल्यात घाटकोपरमधील जवान मुरली नाईक (२३) यांना वीरमरण आले. गेल्या काही दिवसांपासून ते जम्मू परिसरात कर्तव्य बजावत होते.

पहलगाममध्ये पर्यटकांवर झालेल्या हल्ल्यानंतर भारताने दोन दिवसांपूर्वी पाकिस्तानमधील दहशतवादी तळ उद् ध्वस्त केले. त्यानंतर पाकिस्तानने गुरुवारी रात्रीपासूनच भारताच्या विविध सीमावर्ती भागामध्ये ड्रोन आणि क्षेपणास्त्रांनी हल्ले केले. या हल्ल्यात काही भारतीय नागरिक आणि लष्कराच्या जवानांना वीरमरण आले. घाटकोपरमधील कामराज नगर येथे वास्तव्याला असलेले जवान मुरली नाईक गेल्या काही दिवसांपासून जम्मू परिसरातील उरी येथे कर्तव्यावर होते. दरम्यान, शुक्रवारी पहाटे ३ च्या सुमारास पाकिस्तानने केलेल्या एका ड्रोन हल्ल्यात



त्यांना वीरमरण आले.

मुरली नाईक २०२२ मध्ये लष्करात भरती झाले होते. ते मूळचे आंध्र प्रदेशमधील रहिवासी असून सध्या त्यांचे कुटुंबीय आंध्र प्रदेशमधील कफीदांडा या गावी राहत आहेत. मुरली नाईक शहीद झाल्याचे वृत्त समजताच घाटकोपर परिसरात शोककळा पसरली.

**मुंबईतील घाटकोपर वार्ड क्रमांक 133 मध्ये मुरली नाईक यांच्या शहीद झाल्याचे बॅनर लावण्यात आले असून त्यांना स्थानिकांकडून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली आहे. आज 9 मे रोजी पहाटे 3.00 वाजता झालेल्या भारत-पाकिस्तान युद्धादरम्यान मुरली नाईक यांना वीरमरण आल्याचे या बॅनरवरून सांगण्यात आलं आहे. दरम्यान, मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी ट्विट करुन शहीद जवान मुरली नाईक यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. नाईक हे सत्यसाई जिल्ह्यातील गोरंटला तालुक्यातील रहिवाशी होते.**







# गीतासार



## अध्याय १०
## विभूतियोगः

द्यूतं छलयतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् । जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्त्वं सत्त्ववतामहम् ॥ १०-३६ ॥

मी छल करणाऱ्यांतील द्यूत आणि प्रभावशाली पुरुषांचा प्रभाव आहे. मी जिंकणाऱ्यांचा विजय आहे. निश्चयी लोकांचा निश्चय आणि सात्त्विक पुरुषांचा सात्त्विक भाव मी आहे. ॥ १०-३६ ॥

वृष्णीनां वासुदेवोऽस्मि पाण्डवानां धनञ्जयः । मुनीनामप्यहं व्यासः कवीनामुशना कविः ॥ १०-३७ ॥

वृष्णिवंशीयांमध्ये वासुदेव अर्थात मी स्वतः तुझा मित्र, पांडवांमध्ये धनंजय म्हणजे तू, मुनींमध्ये वेदव्यास मुनी आणि कवींमध्ये शुक्राचार्य कवीही मीच आहे. ॥ १०-३७ ॥

दण्डो दमयतामस्मि नीतिरस्मि जिगीषताम् । मौनं चैवास्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवतामहम् ॥ १०-३८ ॥

दंड करणाऱ्यांचा दंड म्हणजे दमन करण्याची शक्ती मी आहे, विजयाची इच्छा करणाऱ्यांची नीती मी आहे. गुप्त ठेवण्यासारख्या भावांचा रक्षक मौन आणि ज्ञानवानांचे तत्त्वज्ञान मीच आहे. ॥ १०-३८ ॥

यच्चापि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन । न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम् ॥ १०-३९ ॥

आणि हे अर्जुना, जे सर्व भूतांच्या उत्पत्तीचे कारण तेही मीच आहे. कारण असे चराचरातील एकही भूत नाही की, जे माझ्याशिवाय असेल. ॥ १०-३९ ॥

नान्तोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप । एष तूद्देशतः प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया ॥ १०-४० ॥

हे परंतपा (अर्थात शत्रुतापना अर्जुना), माझ्या विभूतींचा अंत नाही. हा विस्तार तर तुझ्यासाठी थोडक्यात सांगितला. ॥ १०-४० ॥

# रेसिपी
## मखाना खीर



**साहित्य :**
मखाना - 1 कप, दूध - 5 कप ,साखर - 1 कप ,वेलची पावडर - चिमूटभर ,काजू-बदामचे काप , केशर , तूप - 1 चमचा

**कृती :**
सर्वप्रथम एका पॅनमध्ये तूप गरम करा.
तूप वितळण्यास सुरूवात झाली की, मध्यम आचेवर 2 ते 3 मिनिटे सोनेरी रंगाचे होईपर्यंत तळून घ्यावेत.भाजलेले मखाने आता कुस्करून घ्यावेत.
यानंतर एका पॅनमध्ये दूध उकळवत ठेवा.
दूध उकळण्यास सुरूवात झाली की, आच कमी करून मखाना त्यात घाला.
सतत ढवळत राहा.15 ते 20 मिनिटे मिश्रण शिजू द्या.
दूध घट्ट झाल्यावर त्यात साखर घाला आणि पुन्हा मिनिटभर उकळवा.
यानंतर कापलेले काजू-बदामाचे तुकडे मिश्रणात घाला.
पुन्हा एक उकळी आणून गॅस बंद करा.
अशा पद्धतीने श्री विष्णूंना अर्पण करण्यासाठी मखाना खीर तयार झाली आहे.

# उन्हाळी शिबिरांची उपयुक्तता



वार्षिक परीक्षा संपून सुट्ट्या सुरू झाल्या की जिकडे तिकडे उन्हाळी शिबिरांची रेलचेल सुरू होते. प्रत्येक ठिकाणी गायन, वादन, नाट्य, अभिनय, नृत्य, साहसी खेळ जसे ट्रेकिंग, स्विमिंग अशा विविध विषयांशी निगडित शिबिरांचे आयोजन केले जाते. पालक ही आपल्या मुलांना परीक्षा संपल्या की उन्हाळी शिबिरात दाखल करतात. खरंतर उन्हाळी सुट्टीत मुलांनी मस्त मजा करावी, मित्र मैत्रिणींसोबत मनसोक्त खेळावे, बागडावे, मैदानी खेळ खेळावेत, आवडीची पुस्तके वाचावीत, मामाच्या गावाला किंवा खेडेगावात जाऊन निसर्ग अनुभवावा, गड किल्यांची भटकंती करावी. मुलांनी त्यांची सुट्टी एन्जॉय करावी. पण असे करण्याऐवजी पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबीराच्या दावणीला बांधतात. मुलांचा कल, मुलांची आवड न पाहता पालक आपल्या मुलांना उन्हाळी दाखल करतात. वाढत्या स्पर्धेच्या युगात आपला मुलगा अभ्यासासोबतच इतर कलागुणांमध्येही मागे राहू नये म्हणून पालक आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करतात पण ही उन्हाळी शिबिरं आपल्या मुलांसाठी किती उपयुक्त आहेत या उन्हाळी शिबिरांचा मुलांना खरंच उपयोग होतो का? याचा विचार मात्र पालक करीत नाहीत. उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेबाबत आयोजक गंभीर आहेत का याचाही विचार पालकांनी करावा कारण तीन वर्षांपूर्वी म्हणजे कोरोनाच्या आधी पुण्यात एका शिबिरात मुळशी धरणात पोहायला गेलेल्या तीन मुलांचा बुडून मृत्यू झाला होता. या घटनेमुळे उन्हाळी शिबिरातील मुलांच्या सुरक्षेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. पालकांनीही आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करण्यापूर्वी शिबिरातील सुरक्षा व्यवस्थेची खात्री केली पाहिजे. या शिबिरांना शासनाची मान्यता आहे का याचीही खात्री करायला हवी. सरकारनेही आयोजकांची क्षमता व सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करूनच अशा शिबिरांना मान्यता द्यायला हवी. शिबिरादरम्यान जर काही दुर्घटना घडली तर त्या दुर्घटनेस आयोजकांनाच जबाबदार धरले पाहिजे. काही शिबिरांना मिळणारा प्रतिसाद उत्स्फूर्त असतो तर काहींना अल्प प्रतिसाद मिळतो अर्थात या शिबिरातून सर्वच गोष्टी शिकायला मिळतात असे नाही. याउलट वर्षभर चालणाऱ्या विविध शिबिरातून मुलांना अनेक गोष्टी शिकायला मिळतात असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सुट्टीच्या दिवसातील शिबिरांना बऱ्यापैकी पैसे मोजावे लागतात. टीव्ही, मोबाईल, व्हिडीओ गेममध्ये डोके खुपसून बसण्यापेक्षा पैसे जात असले तरी मुले गुंतून राहत असल्यामुळे पालक हाही खर्च सहन करतात. पालकांचा हेतू उदात्त आहे मात्र पालकांनी मुलांच्या आवडीनिवडी जपाव्यात. आपल्याला हवे तसे नको तर मुलांना हवे ते देण्याचा, शिकवण्याचा प्रयत्न करावा. एकूणच या शिबिरांची आपल्या मुलांना कितपत गरज आहे याचा विचार करूनच पालकांनी आपल्या मुलांना उन्हाळी शिबिरात दाखल करावे.

लेखक
श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# हरवले आहेत



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : श्रीमती अकबरी खातून मोहम्मद कासिम पटेल वय 81 वर्षे या दिनांक 12 जानेवारी 2025 रोजी सकाळी 10 वाजल्याचे सुमारापासून बेपत्ता आहेत, या अनुषंगाने त्यांच्या कुटुंबीयांनी संबंधित व्यक्ती हरवल्या संदर्भात टिटवाळा पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केलेली आहे.
पोलीस आणि कुटुंबीयांनी दिलेल्या माहितीनुसार अकबरी खातून यांचे वय 81 वर्षे असून त्या कान्हाचाळ रूम नंबर 5 पाण्याच्या टाकीजवळ उंभर्णी रोड टिटवाळा पूर्व येथील रहिवासी असल्याचे समजते. रंग काळा सावळा उंची 5 फूट अंगाने सडपातळ , केसांचा रंग पांढरा, उभट चेहरा नाक सरळ तसेच अंगात गुलाबी रंगाची मॅक्सी परिधान केलेली असून त्यांच्या डोळयांखाली कळया रंगाचे डाग आहेत.
वरील वर्णनाची सदर व्यक्ती कोणासही आढळून आल्यास त्याबाबतची माहिती टिटवाळा पोलिसांना द्यावी, असे आवाहन कुटुंबीय आणि पोलिसांनी केलेले आहे

# किन्हवली सहकारी भात गिरणीच्या संचालक पदी दत्तात्रय दिनकर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : तालुक्यातील प्रतिष्ठित असलेल्या किन्हवली सहकारी भात गिरणीच्या संचालक मंडळाच्या २०२५/२६ ते २०३०/३१ च्या निवडणुकीत सहकार क्षेत्रातील दिग्गज असलेले माजी पंचायत समिती सदस्य दत्तात्रय दिनकर यांची संचालक पदी बिनविरोध निवड करण्यात आली.

शहापूर तालुक्यातील मातब्बर नेते, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जेष्ठ नेते,कृषी उत्पन्न बाजार समिती शहापूर यांचेकडून सहकार क्षेत्रातील पुरस्कार प्राप्त व्यक्तिमत्व,खरेदी विक्री संघांचे माजी सभापती व विद्यमान संचालक, अस्नोली गावचे माजी सरपंच, माजी पंचायत समिती सदस्य दत्तात्रय मंगल दिनकर यांची किन्हवली शेतकरी सहकारी राईस मिलवर ओबीसी गटातून बिनविरोध संचालक पदी निवड करण्यात आली. किन्हवली पंचक्रोशीतील अनेक दिग्गजांनी दत्तात्रय दिनकर यांचा अनुभव पाहून आपले उमेदवारी अर्ज माघारी घेऊन त्यांची बिनविरोध निवड केली. दरम्यान किन्हवली राईस मिलच्या मतदारांचे व संचालकांचे दत्तात्रय दिनकर यांनी आभार मानले. दरम्यान सदर निवणूकीचे मतदान १४ मे २०२५ रोजी सकाळी ८ ते संध्याकाळी ४ वाजेदरम्यान होणार असून त्याच दिवशी मतमोजणी होणार आहे.

# ग.वि.खाडे विद्यालयाची माजी विद्यार्थीनी झाली मंत्रालय कक्ष अधिकारी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : शहापूर येथील ग.वि. खाडे विद्यालयाची माजी विद्यार्थीनी मधुरा मीनाक्षी रमाकांत पाटील हीने लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा परिक्षा २०२३ मधून मंत्रालय कक्ष अधिकारी गट - ब (राजपत्रित अधिकारी) म्हणून निवड झाल्याने सर्व स्तरांतून तिचे अभिनंदन केले जात आहे. तर ही निवड शाळेसाठी सुद्धा गौरवास्पद मानली जात आहे.

एमपीएससी मार्फत घेण्यात येणाऱ्या राज्यसेवा परीक्षा 2023 मधून मंत्रालय कक्ष अधिकारी म्हणून निवड झालेल्या मधुरा हिचे वडील याच शाळेचे सेवानिवृत्त शिक्षक आर. के. पाटील सर व आई मीनाक्षी पाटील मॅडम आहेत. त्यामुळे मधुरासह तिच्या आई वडीलांचेही सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे. तसेच मधुरा पाटील यांना पुढील प्रशासकीय वाटचालीस शहापुरातून शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

# बदलापूरमध्ये मॉक ड्रिल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : केंद्रीय गृह विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपत्कालीन परिस्थितींसाठी सज्जता तपासण्यासाठी "ऑपरेशन अभ्यास" या मॉक ड्रिलचे आयोजन बदलापूर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज उद्यान, सुरवळ चौक, बदलापूर (पूर्व) येथे आज, दि.9 मे 2025 रोजी दुपारी 4 वाजता करण्यात आले आहे.

हे मॉक ड्रिल जिल्हाधिकारी तथा नागरी संरक्षण दलाचे नियंत्रक अशोक शिनगारे, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने व प्रांताधिकारी विजयानंद शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार अमित पुरी यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात येणार आहे.

मॉक ड्रिल मध्ये होणारा घटनाक्रमः-
- बदलापूर आणि आजूबाजूच्या परिसरातील सायरन वाजणार.
- Air Strike/ बॉम्ब हल्ल्याची सूचना मिळणार.
- सर्व नागरिकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचण्यासाठीच्या सूचना दिल्या जाणार.
- धावाधाव, गडबड न करता नागरिकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचविले जाईल.
- संबंधित परिसरात शोध मोहीम घेवून जखमी, अडकलेल्या नागरिकांची तात्काळ सुटका करणे, त्यांना प्रथमोपचार करणे, ही कार्यवाही करण्यात येईल.

यानुषंगाने सर्व यंत्रणांनी या मॉक ड्रिलला गांभीर्याने घ्यावे. केंद्रीय गृह विभागाने दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करून यशस्वीरित्या ही मॉक ड्रिल पार पाडावी. मॉक ड्रिलच्या दरम्यान सूचना मिळाल्यानंतर दुपारी 4 वाजता सायरन वाजवून नागरिकांना धोक्याचा इशारा दिला जाईल.या दरम्यान नागरिकांनी घाबरू नये, अफवांवर विश्वास ठेवू नये, सेल्फी काढू नये आणि प्रशासनाकडून दिलेल्या सूचनांचे पालन करावे, हे मॉक ड्रिल केवळ पूर्वतयारीचा भाग असून कोणतीही खरी आपत्ती उद्भवलेली नाही, हे लक्षात घ्यावे, असे आवाहन तहसिलदार अमित पुरी यांनी केले आहे.

# भिवंडी न्यायालय वकील संघटना अध्यक्षपदी किरण चन्ने



ॲड.किरण चन्ने

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

झिडके-अंबाडी : भिवंडी न्यायालयाच्या नुकत्याच पार पडलेल्या वकील संघटनेच्या निवडणुकीत अध्यक्षपदी ॲड किरण दत्तू चन्ने यांची बहुमताने निवडून झाली आहे.

भिवंडी न्यायालय हे सध्या जिल्हा सत्र न्यायालय म्हणून कार्यरत आहे.भिवंडी शहर आणि ग्रामीण तालुक्यातील नागरिकांचे विविध स्वरूपातील खटले यांचे कामकाजाचे स्वरूप पाहता पक्षकारांना त्यांच्या खटल्यांसंबधी आवश्यक असणारी मदत करणारी वकील संघटना जर प्रभावीपणे कार्यरत असेल तर पक्षकारांना नक्कीच त्यांच्या न्यायालयीन कामात योगदान दिले जाते हे स्पष्टच आहे.

त्यातच ॲड किरण चन्ने हे सामाजिक जाणीव असणारे तडफदार चळवळीतील नेतृत्व असल्यामुळेच भिवंडी सारख्या न्यायालयात वकील संघटनेच्या माध्यमातून गरजू पक्षकारांना नक्कीच मदत करतील यात शंकाच नाही.त्याचबरोबर आपल्या वकील सहकाऱ्यांना बरोबर घेऊन,भविष्यात न्यायालयीन कामकाज उत्कृष्ट कसे चालेल याकडे लक्ष ठेवून आपल्या पदाच्या कार्यकालात विशिष्ठ ठसा उमटवतील अशी अपेक्षा तमाम त्यांच्या हितचिंतकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.त्यामुळेच त्यांच्या नियुक्तीबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवर व सर्वसामान्य यांच्याकडून ॲड किरण चन्ने यांना शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# बारावीमध्ये ८७ टक्के गुण मिळवून तनुजा तुपे मुरबाडमध्ये प्रथम




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यात इयत्ता बारावीचा निकाल ५मे २०२५ रोजी जाहीर झाला त्यामध्ये मुरबाड तालुक्यात प्रथम येण्याचा मान जनसेवा शिक्षण मंडळ संचालित मुरबाड असोळे विभाग हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय असोळे हायस्कूलची कला शाखेमधून इयत्ता बारावी मध्ये तनुजा तुपे हिने ८७ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे.

तसेच पुढील निकाल विद्यालयाप्रमाणे:-विद्या मंदिर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय शिवळे या विद्यालयातील विज्ञान शाखेचा निकाल ९७%१३ टक्के लागला आहे. त्यामध्ये प्रथम क्रमांक संभाजी भुंडेरे ७४%५०, द्वितीय क्रमांक गणेश मोरे ७३%८६ तृतीय क्रमांक श्रद्धा पवार ७२%६७.
वाणिज्य शाखेचा निकाल ५९%६१ टक्के लागला आहे. त्यामध्ये प्रथम क्रमांक प्रिया कुशवाह,८९%१७ द्वितीय क्रमांक संध्या चव्हाण ८३%६७, तृतीय क्रमांक नसिर शेख ८३%५,
कला शाखेचा निकाल५९.६१ यामध्ये प्रथम क्रमांक हर्षदा गोल्हे ७५%८३. द्वितीय क्रमांक अश्विनी निमसे ६५.३३, तृतीय क्रमांक जयंती गोल्हे.
*महात्मा गांधी विद्यालय कनिष्ठ महाविद्यालय कला शाखेचा निकाल ९७.६१ यामध्ये प्रथम क्रमांक आरती विशे ७०.६७, द्वितीय क्रमांक पियुष गायकवाड ६३.६७, तृतीय क्रमांक शुभम खारीक ६३.६७.
विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के यामध्ये प्रथम क्रमांक सायली पाटील ६८.५०, द्वितीय क्रमांक प्रणाली घोलप ६७.५०, तृतीय क्रमांक शुभम पवार ६६.५०.
व्यवसाय अभ्यासक्रम (mcvc) ८२.३५ यामध्ये प्रथम क्रमांक वैभव देसले ६३.८३.द्वितीय क्रमांक गौरव वागे६३.००, तृतीय क्रमांक कांता वाघ ६२.५०
जनता विद्यालय धसई निकाल ९४. टक्के
वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के यामध्ये प्रथम क्रमांक वेदिका उमवणे ७९.१७, द्वितीय क्रमांक अस्मिता पारधी ७५.३३, तृतीय क्रमांक भाविका जाधव ७१.००
कला शाखेचा निकाल ८८.५२ यामध्ये प्रथम क्रमांक साक्षी इरनक ७०.१७. द्वितीय क्रमांक कामिनी सोंगाल ६५.६७, तृतीय क्रमांक सागर कवटे ६४.३३
त्यामुळे -मुरबाड तालुक्यात इयत्ता बारावीच्या परीक्षेला १७५९ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यामध्ये ६९५ विद्यार्थी, ८५३ विद्यार्थिनी परीक्षा दिली होती.
६९५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत तर ८५३ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाले आहेत मुरबाड तालुक्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली तनुजा तुपे हिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# नाल्यात रॅबिट टाकणाऱ्या ठेकेदाराचा प्रकार उघडकीस



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कल्याण डोंबिवली महानगर पालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी डोंबिवली पश्चिमेकडील नाले सफाईची पाहणी केली होती. मात्र दुसऱ्या दिवशी शुक्रवारी डोंबिवली पूर्वेकडील एका नाल्यात ठेकेदाराने रॅबिट टाकून भराव टाकल्याचा प्रकार उघडकीस आला. याबाबतची माहिती कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघ आमदार राजेश मोरे यांना मिळताच त्यांनी संबंधित ठिकाणी या घटनेची ताबडतोब पाहणी केली. या कृतीबाबत मोरे यांनी नाराजी व्यक्त केली. यानंतर मोरे यांनी कामात हलगर्जी पणा करणाऱ्या एमआयडीसी च्या ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर कारवाई करा अशी मागणी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडे केली आहे.

पावसाळ्या पूर्वी म्हणजे एक महिना अगोदरच नाले गटारे यातील साफसफाई होणे आवश्यक असते. मात्र अद्याप काही नाले पूर्णपणे साफ झालेले नाहीत. डोंबिवली एम आय डीसी परिसरात अद्यापही नाल्यांची सफाई झालेले नाही. परिसरा तील काही ठिकाणी नाल्यांची कामे एमआयडीसीकडून होत असून ही कामे अतिशय संथ गतीने होत आहेत. नाले साफ करणे क्रमप्राप्त असताना डोंबिवली पूर्वेकडील नाल्यांमध्ये रॅबिट टाकून भराव टाकण्यात आला आहे. आमदार मोरे सदर ठिकाणची पाहणी केली. या पाहणी नंतर राजेश मोरे यांनी या कामांबाबत नाराजी व्यक्त केली. आमदार राजेश मोरे यांनी उद्योग मंत्री उदय सामंत यांना पत्र पाठवत एमआयडीसीकडून सुरू असलेले नाल्यांचे काम हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे सुरू आहे या कामांमुळे अद्यापही नालेसफाई करता आलेली नाही त्यामुळे लोकांच्या घरात पाणी जाऊन लोकांना त्रास होऊ शकतो. नाल्यांच्या कामांमध्ये हलगर्जी पणा करणाऱ्या संबंधित ठेकेदार आणि अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करा अशी मागणी राजेश मोरे यांनी केली आहे.

याबाबत पालिकेचे शहर अभियंता अनिता परदेशी यांनी एमआयडीसीच्या संबंधित अधिकाऱ्यांना पत्र पाठवून नाल्यात टाकण्यात आलेला भरावा काढण्याची कारवाई करा अशा सूचना दिल्या आहेत. तसेच नाल्यांचे कामे हे लवकरात लवकर पूर्ण करा असे देखील एमआयडीसीच्या संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आल्याचे समोर येत आहे.

# महाराष्ट्राच्या गतका खेळाडूंचे खेलो इंडिया स्पर्धेमध्ये रुपेरी यश



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : गतका खेळामधील फरिसोटी टीम या क्रीडा प्रकारांमध्ये मुलींच्या संघाने रजत पदक प्राप्त केले आहेत. गतका खेळात महाराष्ट्राला प्रथमच खेलो इंडिया स्पर्धेमध्ये यश संपादन झाले आहे. श्रमिका पाटील, तन्मयी पाटील, सेजल गालींदे या तीनही खेळाडू महाराष्ट्राच्या संघात होत्या. या संघासाठी प्रा.आरती चौधरी, मंथन पवार यांनी प्रशिक्षक म्हणून तसेच आकाश थोरात यांनी व्यवस्थापक काम पाहिले. असोसिएशन ऑफ गतका, महाराष्ट्राच्या वतीने अध्यक्ष संतोष चौधरी व उपाध्यक्ष अभिनेत्री अश्विनी महांगडे आणि सचिव प्रा. आरती चौधरी यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र शासन आणि क्रीडा युवक सेवा संचालन यांनी खेळाडूंसाठी उत्तम सुविधा उपलब्ध करून दिल्या त्याबद्दलमहाराष्ट्राच्या गतका खेळाडूंचे खेलो इंडिया स्पर्धेमध्ये रुपेरी यश आभार व्यक्त केले.







# युद्धाच्या पार्श्वभूमीवर कल्याणमध्ये ड्रोनची अफवा : नागरिकांमध्ये घबराट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - गुरुवारी रात्री पाकिस्तानची लष्करी विमाने, ड्रोन भारताकडून नेस्ताबूत करण्यात आली. याविषयीच्या बातम्या, काही दूरचित्रवाहिन्यांवर कल्याण, डोंबिवलीतील नागरिक गुरुवारी मध्यरात्री उशिरापर्यंत पाहत होते. याचवेळी कल्याण पश्चिमेत आधारवाडी भागात आकाशात तीन ड्रोन फिरत असल्याची अफवा पसरली आणि काही वेळ नागरिकांमध्ये घबराट पसरली.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात गुरुवारी रात्री जोरदार हवाई हल्ले सुरू होते. दूरचित्रवाहिन्यांवरून हे थेट प्रक्षेपण पाहत असताना धडकी भरविणारे येणारे भोंग्यांचे आवाज. त्यानंतर हवेतल्या हवेत भारताकडून पाकिस्तानची क्षेपणास्त्रे, ड्रोन नष्ट करण्याची चपळाई. उत्तर भारतात युध्दामुळे बंद करण्यात आलेला वीज पुरवठा. ही सगळी दृश्ये नागरिक पाहत होते. याचवेळी कल्याणमधील काही नागरिकांना कल्याण मधील आधारवाडी भागात आकाशात तीन ड्रोन फिरत असल्याची जाणीव झाली.

कल्याणमध्ये दोन दिवसापूर्वी युध्दसरावाचे प्रशिक्षण जिल्हा आपत्कालीन विभागातर्फे करण्यात आले. यावेळी युध्दाच्या परिस्थितीत नागरिकांनी कोणती काळजी घ्यायची याविषयी माहिती प्रात्यक्षिकांद्वारे देण्यात आली होती. दरम्यान, कल्याण शहरातील आधारवाडी भागात रात्री १२ ते १२.३० वाजेदरम्यान तीन ड्रोन सदृश्य काही हालचाली आकाशात होत असल्याचे समजले. या हालचाली पाहत असताना नागरिकांमध्ये काही वेळ घबराट पसरली होती.

अनेक कुटुंबे घराबाहेर येऊन आकाशातील या हालचाली आपल्या नजरेने टिपत होते. हे ड्रोन कल्याण शहरावर काही संशयित हालचाली करत असल्याचे वाटल्याने जागरूक नागरिकांनी तातडीने पोलिसांच्या सेवा संपर्क क्रमांकावर संपर्क साधला. बाजारपेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ही माहिती मिळाल्याने अधिकारी आणि गस्ती पोलिसांनी क्षणाचाही विलंब न लावता घटनास्थळी जाऊन पाहणी केली.

पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांना यासंदर्भातची माहिती देण्यात आली. पोलिसांनी बारकाईने अवलोकन केले. त्यावेळी ती नियमित विमान होती. एक विमान कमी उंचीवरून जात होते. तर, दोन विमाने आपल्या नियत मार्गान इच्छित स्थळी चालली होती, असे निर्दशनास आले. हे ड्रोन नसून ती विमाने असल्याचे समजल्यावर नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. नागरिकांना आपल्या आसपास, शहरात काही संशयास्पद हालचाली आढळून आल्या तर त्यांनी तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा. कोणत्याही अफवांवर नागरिकांनी विश्वास ठेऊ नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# पालिका हद्दीतील खड्डे तातडीने बुजवा

## उल्हासनगर आयुक्त मनिषा आव्हाळे यांचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगरः** उल्हासनगर शहरातील रस्त्यांची स्थिती दयनीय असून विविध कामांच्या खोदकामामुळे कायमच वाहतूक कोंडीची स्थिती असते. त्यातच जलवाहिन्यांची गळती, परिणामी पडणारे खड्डे आणि कचरा यामुळे अस्वच्छता वाढल्याचे दिसून आले आहे. याच परिस्थिती उल्हासनगर महापालिकेच्या आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी नुकतीच पाहणी केली. या पाहणीनंतर खड्डे तातडीने बुजवण्याचे आदेश देण्यात आले.

गळती काढणे, कचरा आणि अतिक्रमण हटवण्याचेही आदेश यावेळी आयुक्तांनी दिले. त्यामुळे आता खड्डे लवकर बुजतील अशी आशा आहे.

शहरातील कोंडी, अस्वच्छता आणि पावसाळयापूर्वीच्या कामांचा आढावा घेण्यासाठी उल्हासनगर



महापालिका आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह शहरातील विविध स्थळांची पाहणी केली.

उल्हासनगर कॅम्प १ मधील धोबी घाट रस्ता, कल्याण मुरबाड रस्ता, उल्हासनगर कॅम्प २ मधील खेमाणी भाजी मार्केट चौक, एस.ई.एस शाळा, खेमाणी चौक, नानिक जिरा चौक, मध्यवर्ती पोलीस ठाणे रस्ता, उल्हासनगर कॅम्प तीन भागातील मयुर हॉटेल रस्ता, कल्याण बदलापूर राज्यमार्गावरील फॉलवर लाईन चौक, उल्हासनगर कॅम्प चार भागातील लालचक्की ते उल्हासनगर रेल्वे स्थानक रस्ता, शिवनेरी रूग्णालय रस्ता, उल्हासनगर कॅम्प पाच भागातील भाटीया चौक ते गाऊन बाजार रस्ता, नविन टाऊन सभागृह, नेताजी चौक ते हिल लाईन पोलीस ठाणे रस्ता, भाजी मंडई, तहसीलदार कार्यालय ते मासळी बाजार रस्ता या भागात पाहणी केली.

उल्हासनगर शहरातील जवळपास सर्वच वर्दळीचे रस्ते, चौक, बाजारपेठा आणि महत्वाच्या आस्थापनाच्या परिसरातील सद्यस्थितीची यावेळी पाहणी करण्यात आली.

यातील बहुतांश रस्ते, चौकांमध्ये आयुक्त मनिषा आव्हाळे यांना खड्डे निर्माण झाल्याचे दिसून आले. तसेच अनेक भागात रस्त्यावर गळक्या जलवाहिन्यांमुळे पाणी पसरल्याचेही निदर्शनास आले. काही ठिकाणी रस्त्याच्या दुतर्फा अतिक्रमण दिसून आले.

रस्त्यावरील अतिक्रमण, रस्त्यात पडलेले खड्डे आणि गळक्या जलवाहिन्यांमधून येणारे पाणी यामुळे वर्षानुवर्षे रस्त्यांवर अस्वच्छता आणि वाहतूक कोंडी होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे सर्व खड्डे सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे पावसाळ्यापूर्वी भरून घ्यावे, असे आदेश यावेळी आयुक्त मनिषा आव्हाळे दिले. तर सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे सुरू असलेली रस्त्यांची कामे वेगाने पूर्ण करण्याचेही आदेश यावेळी देत संबंधित कंत्राटदारांना नोटीसा बजावण्याचेही आदेश देण्यात आले.

# रिक्षाचालकांकडून प्रवाशाची लूट नवी मुंबईत जाण्यासाठी दुप्पट भाडे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे ते नवी मुंबई या मार्गावरील ट्रान्स हार्बर रेल्वे वाहतूक सेवा शुक्रवारी सकाळी ठप्प झाली. यामुळे ठाणे स्थानकात अडकून पडलेल्या प्रवाशांनी बस किंवा रिक्षा अशा मिळेल, त्या वाहनाने नवी मुंबईत कामाच्या ठिकाणी जाण्याचा निर्णय घेतला. परंतु रेल्वे सेवा ठप्प झालेल्या संधीचा फायदा घेत रिक्षाचालकांनी दुप्पटपेक्षाही जास्त भाडे आकारत प्रवाशांची लूट केली.

नवी मुंबई शहरात अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कंपन्यांची कार्यालये आहेत. तसेच अनेक खासगी कार्यालये आहेत. याठिकाणी ठाणे, कल्याण, कर्जत, कसारा भागातील नागरिक काम करतात. हे सर्वजण ठाणे स्थानक येथून ट्रान्स हार्बर मार्गे नवी मुंबईच्या दिशेने प्रवास करतात.

यामुळे ठाणे स्थानकातील फलाट ९ आणि १०, १० अ येथे नोकरदार वर्गाची मोठी गर्दी असते. ट्रान्स हार्बर मार्गावर ऐरोली काटई नाका उन्नत मार्गाच्या निर्माणाचे काम सुरू असून त्यासाठी शुक्रवारी 'एमएमआरडीए'कडून या ठिकाणी गर्डर उभारण्यात येत होते.



# भाईंदर शहर पुराच्या तोंडी ?

## नाल्यांवर यांत्रिक झडपा बसवण्याचा निर्णय बारगळला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदरः** मिरा भाईंदर शहरात पावसाळयात निर्माण होणाऱ्या पूर परिस्थितीला आटोक्यात ठेवण्यासाठी नैसर्गिक नाले व खाड्यांच्या प्रवेशद्वारावर यांत्रिक झडपे बसवण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. मात्र शासनाकडून यासाठी निधी उपलब्ध करून दिला जात नसल्यामुळे हे काम रखडून गेले आहे.

मिरा भाईंदर हे खाडी किनारी वसलेले शहर आहे. त्यामुळे या शहरावर समुद्राच्या पाण्याचा मोठा प्रभाव आहे. शहरातून निघणारे नैसर्गिक नाले याच खाड्यांना जाऊन मिळत असतात. परिणामी समुद्रातील भरती - अहोटीच्या वेळेनुसार या पाण्याचा विसर्ग होत असतो.

मात्र पावसाळ्यात अतिवृष्टी झाल्यास यात मोठा व्यत्यय निर्माण होतो. आणि नाले हे ओसंडून वाहू लागल्याने शहरात पूरस्थिती निर्माण होते. त्यामुळे ही समस्या दूर करण्यासाठी मुंबई महापालिकेने राबवलेल्या योजनाच्या धर्तीवर मिरा भाईंदरमध्ये ही नैसर्गिक नाले आणि खाड्यांच्या मुख्य प्रवेशद्वारावर यांत्रिक झडपे बसवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

प्रामुख्याने महापालिकेची आर्थिक परिस्थिती नाजूक असल्यामुळे हे काम शासन निधीतून करण्याचे ठरले आहे. याबाबत निधी मंजुर करण्याचा प्रस्ताव प्रशासनाकडून शासनाला सादर करण्यात आला आहे. परंतु यावर शासनाकडून प्रतिसाद देण्यात आलेला नाही. परिणामी हे काम रखडले असून येत्या पावसात पूरस्थितीचा धोका उद्भवण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**१८ ठिकाणी झडपे**

**याबाबत महापालिकेने विशेष सर्वेक्षण करून १८ ठिकाणी हे झडपे बसवण्याचे निश्चित केले आहे. तर पहिल्या टप्प्यात मुर्धा व घोडबंदर खाडी किनारी हे झडपे बसवण्याची निविदा प्रसिद्ध करण्यात आली असल्याची माहिती पालिकेने दिली आहे.**

**"झडपे उभारण्याच्या कामाचा प्रस्ताव शासनपुढे सादर करण्यात आला आहे. तसेच याबाबतची निविदा प्रक्रिया राबावण्यात आली आहे. यास मंजुरी आल्यानंतर काम सुरु होईल."**

**- नितीन मुकणे, कार्यकारी अभियंता (सार्वजनिक बांधकाम विभाग)**



# दहिसरमधील माजी नगरसेवक हर्षद कारकर शिंदे गटात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : मुंबई महानगरपालिका विधी समितीचे माजी अध्यक्ष आणि २०१७ ते २०२२ या कालावधीतील शिवसेनेचे माजी नगरसेवक हर्षद प्रकाश कारकर यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडून शिवसेनेत (शिंदे) प्रवेश केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत कारकर यांनी शुक्रवारी शिवसेनेत (शिंदे) प्रवेश केला. मागाठाणे विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेचे (ठाकरे) माजी नगरसेवक संजय घाडी आणि त्यांच्या पत्नी उपनेत्या व प्रवक्त्या संजना घाडी यांनी ठाकरे गटाला 'जय महाराष्ट्र' करीत शिवसेनेत (शिंदे) प्रवेश केल्यानंतर १५ दिवसात दहिसरमधील माजी नगरसेवक हर्षद कारकर यांनीही ठाकरे यांची साथ सोडली.

कारकर यांनी पत्नी दिक्षा कारकरसह शिवसेनेत (शिंदे) प्रवेश केला. दिक्षा या युवासेनेच्या कार्यकारिणी सदस्य असून सध्या महिला आघाडीच्या उपविभाग संघटक म्हणूनही त्या सक्रिय आहेत.

पालिका निवडणुकीच्या तोंडावर ठाकरे गटातून शिंदे यांच्या पक्षात जाणाऱ्यांची संख्या वाढू लागली आहे. कारकर यांच्याबरोबर दहिसरमधील महिला कार्यकर्ते, शिवसैनिक, तसेच आजी-माजी शाखाप्रमुख, उपशाखाप्रमुख आणि गटप्रमुखांनी शिवसेनेत (शिंदे) प्रवेश केला.

## ब्लॉक कालावधीत बसविण्यात आलेला गर्डर तिरका झाल्याने

# ट्रांस हार्बर मार्गावरील लोकल सेवा ठप्प

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणेः** ठाणे- नवी मुंबई वाहतुकीसाठी महत्त्वाच्या असलेल्या ठाणे ते वाशी, पनवेल, नेरूळ ट्रान्स हार्बर मार्गावरील रेल्वे वाहतुक ठप्प झाली आहे. ऐरोली पुलाचे गर्डर तिरके झाल्याने हा परिणाम झाला आहे. ट्रान्स हार्बर मार्गिकवर रेल्वेगाड्या उपलब्ध नसल्याने सकाळी ठाणे, दिघा, ऐरोली रेल्वे स्थानकात प्रवाशांची गर्दी उसळली आहे. नोकरदारांकडून संताप व्यक्त केला जात आहे. अनेकांनी घरचा रस्ता धरला. तर काही प्रवासी ठाण्याहून रस्ते मार्गे नवी मुंबईच्या दिशेने निघाले होते.

मुंबई : ट्रान्स हार्बर मार्गावरील रेल्वे वाहतूक शुक्रवारी सकाळी ऐन गर्दीच्या वेळी ठप्प झाली. कार्यालयात जाण्यासाठी रेल्वे स्थानकांवर पोहोचलेल्या प्रवाशांची तारांबळ उडाली. या गोंधळाचा फटका पनवेल, नेरूळ, वाशीमार्गे ठाणे आणि मुंबईकडे जाणाऱ्या हजारो नोकरदारांना बसला. कार्यालय गाठण्यासाठी अनेकांना तारेवरची कसरत करावी लागली. एमएमआरडीएने ठाणे आणि ऐरोलीदरम्यान गर्डर उभारण्यासाठी

## साडे चार तासानंतर रेल्वे सेवा पूर्ववत

**ठाणे- नवी मुंबई वाहतुकीसाठी महत्त्वाच्या असलेल्या ठाणे ते वाशी, पनवेल, नेरूळ ट्रान्स हार्बर मार्गावरील रेल्वे वाहतुक ठप्प झाली होती. अखेर साडे चार तासानंतर येथील रेल्वे सेवा पूर्ववत झाली आहे. या दरम्यान २८ अप आणि २८ डाऊन रेल्वे सेवा रद्द झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) बसविलेले गर्डर तिरके झाल्याने हा परिणाम झाला होता. रेल्वे सेवा ठप्प झाल्याने सकाळी कामानिमित्ताने बाहेर पडणाऱ्या नागरिकांचे मोठे हाल झाले होते.**

ट्रान्स हार्बर मार्गावर गुरुवारी मध्यरात्री १ ते पहाटे ४ या वेळेत ब्लॉक घेतला होता. मात्र, त्या कामाचा परिणाम सकाळच्या वाहतुकीवर झाला आणि रेल्वे वाहतूक ठप्प झाल्याने प्रवासी हैराण झाले. ब्लॉक कालावधीत बसविण्यात आलेल्या ऐरोली पुलाचा गर्डर तिरका झाल्याने या मार्गावरील रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला. शुक्रवारी सकाळी ७ वाजल्यापासून ट्रान्स हार्बर मार्गावरील रेल्वे वाहतूक ठप्प झाली होती. त्यामुळे पनवेलमार्गे ठाणे आणि वाशीमार्गे मुंबईला जाणाऱ्या हजारो प्रवाशांना फटका बसला. अनेक प्रवाशांना कार्यालयात पोहोचण्यास विलंब झाला. ट्रान्स हार्बर मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाल्यामुळे अनेकांना ॲप आधारित टॅक्सीचा पर्याय स्वीकारून कार्यालय गाठावे लागले. नवी मुंबई येथील ऐरोली, रबाळे, घणसोली आणि तुर्भे



भागात मोठ्याप्रमाणात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कंपन्या आणि कारखाने आहे. त्यामुळे ठाणे ते कर्जत, कसारा आणि मुलुंड, भांडूप, मुंबई उपनगरातील लाखो प्रवासी दररोज ठाणे रेल्वे स्थानकातून ट्रान्स हार्बर मार्गे नवी मुंबईत जात असतात. ट्रान्स हार्बर मार्गावर २५० हून अधिक रेल्वेगाड्यांच्या फेऱ्या नेरूळ, वाशी आणि पनवेलच्या दिशेने होतात. ठाणे रेल्वे स्थानकातील फलाट क्रमांक नऊ आणि '१० आणि १० अ या फलाटांवर रेल्वेगाड्या थांबविल्या जातात. पहाटे ट्रान्स हार्बर मार्गावर 'एमएमआरडीए'ने ठाणे आणि ऐरोली दरम्यान गर्डर बसविण्यासाठी ट्रान्स हार्बर मार्गावर मध्यरात्री १ ते पहाटे ४ या वेळेत ब्लॉक घेतला होता. हे गर्डर तिरके झाल्याचे लक्षात आल्यानंतर ट्रान्स हार्बर मार्गावरील रेल्वे वाहतुक सकाळी ७.१० वाजल्यापासून रेल्वे वाहतूक थांबवण्यात आली आहे. रेल्वे वाहतुक थांबविल्याने त्याचा परिणाम मोठ्या प्रमाणात झाला.

# डोंबिवलीत उबर चालकांना मारहाण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली : डोंबिवली जवळ दावडी, पिसवली जवळील पिंगारा बार जवळ दोन वेगळ्या घटनांमध्ये दोन वाहन चालकांना तरूणांच्या गटाने बेदम मारहाण केली. या प्रकरणातील रिक्षा चालकावर चॉपरने, तर उबर मोटार चालकावर दगड, विटांनी हल्ला करून त्यांना जखमी केले आहे. या दोन्ही घटनाप्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात दोन स्वतंत्र गुन्हे दाखल आहेत. पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या तक्रारीतील माहितीनुसार, डोंबिवली पूर्व शेलार नाका भागातील इंदिरानगर झोपडपट्टी भागात विकास खरात (३०) हे रिक्षा चालक कुटुंबीयांसह राहतात. ते डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक ते दावडी गाव अशी रिक्षातून प्रवासी वाहतूक करतात. रविवारी सायंकाळी साडे सात वाजता ते रिक्षेतून दावडी येथे प्रवासी सोडण्यास गेले. तेथून परतत असताना त्यांना दावडी येथे सागर्ली येथे राहणारा त्यांचा मित्र अरविंद वानखेडे यांना इंदिरानगर झोपडपट्टी भागात राहणारे इमलेश जयस्वाल, शुभम जयस्वाल मारहाण करत होते असे रिक्षा चालक खरात यांना दिसले.**

# दोन दिवसात पालघर जिल्ह्यात ३१ मिलिमीटर पाऊस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पालघरः** जिल्ह्यात ६ व ७ मे रोजी वादळी वाऱ्यासह ३१ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून या महिन्यातील पर्जन्यमान सरासरीच्या ३०० टक्के इतके आहे. या अवकाळी पावसात सुमारे ८०० हेक्टरवरील फळबागांचे व भात पिकाचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत आहे. जव्हार व मोखाडा या दोन तालुक्या व्यतिरिक्त उर्वरित सर्व सहा तालुक्यांमध्ये ६ व ७ मे रोजी जोरदार पाऊस झाला. ६ मेच्या सायंकाळी ताशी २० ते ६० किलोमीटर वेगाने वारा वाहत असल्याने धाकटी डहाणू बंदरात नांगरलेल्या ४५- ५० मासेमारी बोटींचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. गेल्या दोन दिवसात तलासरी तालुक्यात सर्वाधिक ४९ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून डहाणू तालुक्यात ४२ मिलिमीटर, पालघर व वाडा तालुक्यात प्रत्येकी ३१.३० मिलिमीटर, विक्रमगड तालुक्यात २९.३ मिलिमीटर, वसई तालुक्यात २६ मिलिमीटर तर जव्हार व मोखाडा तालुक्यात प्रत्येकी ८.३० पावसाची नोंद झाली. पालघर शहरात आज सकाळी तब्बल ७५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून किनाऱ्यालगतच्या भागात विजेच्या गडगडाटासह पाऊस काल सायंकाळपर्यंत पाऊस सुरू राहिल्याने खंडित झालेल्या वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी कालची मध्यरात्र झाली. जिल्ह्यात आंबा चिकू, जांभु व जांभ या फळांसोबत भाजीपाला व उन्हाळी भात लागवडीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सुमारे ८०० हेक्टर कृषी क्षेत्र बाधित झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. यामध्ये डहाणू तालुक्यातील ४०० हेक्टर, पालघर तालुक्यातील २०० हेक्टर व वाडा तालुक्यातील १५० हेक्टरचा समावेश आहे. कृषी विभागाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे सुरू केले असून पंचनामे लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आले आहे.

१६ ते १८ मे २०२१ रोजी पालघर जिल्ह्याच्या किनाऱ्याच्या बाजूने तौक्ते चक्रीवादळ गेले होते. त्यावेळी वादळी परिस्थिती सह पालघर शहरात ५०० मिलिमीटर नोंद झाली होती. मे २०२३ च्या पहिल्या आठवड्यात अवकाळी पावसाच्या सरी पालघर मध्ये झाल्या होत्या. तर २०२२ व २०२४ वर्षातील मे महिना कोरडा गेल्याची माहिती कृषी विभागाकडून उपलब्ध झाली आहे.

# ठाण्या मुंबईतील अवकाळी पावसाला ब्रेक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबईः** मागील दोन दिवसांपासून मुंबईत संततधार सुरू असलेला पाऊस आजपासून ओसरणार आहे. मुंबई आणि मुंबई महानगर क्षेत्रात पुढील काही दिवस कोरडे वातावरण असेल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

गेले दोन दिवस मुंबई शहर, तसेच उपनगरात पावसाच्या सरी कोसळत होत्या. काही भागात सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली होती. यामुळे वातावरणात गारवा निर्माण होऊन काहीसा दिलासा मिळाला होता. यामुळे मुंबईच्या तापमानातही घट झाली. मात्र, आजपासून मुंबईतील पावसाचा जोर ओसरणार आहे. काही भागात हलक्या सरी होतील. परंतु वादळी वाऱ्यांची शक्यता नसल्याचे हवामान विभागाकडून सांगण्यात आले. यामुळे पुन्हा एकदा मुंबईकरांना उकाडा सहन करावा लागण्याची शक्यता आहे. शहरात पावसाची शक्यता १० टक्क्यांपेक्षा कमी असून, आकाश प्रामुख्याने अंशतः ढगाळ किंवा निरभ्र राहील. काही भागांत आर्द्रतेचा परिणाम जाणवू शकतो, मात्र जोरदार सरींची शक्यता कमी आहे. त्यामुळे मुंबई परिसरात कमी दमट आणि तुलनेने उष्ण वातावरण जाणवण्याची शक्यता आहे.

# महानगर टेलिफोनच्या कोट्यवधी रुपयांच्या वायरची चोरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : पूर्व उपनगरांमध्ये जमिनीखालील एमटीएनलच्या वायर काढून त्यांची चोरी करणारी एक सराईत टोळी सध्या सक्रिय आहे. या टोळीने आतापर्यंत कोट्यवधी रुपये किंमतीच्या वायरची चोरी केल्याचा संशय आहे. पंतनगर पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली असून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत. गेल्या काही दिवसांपासून पूर्व उपनगरातील अनेक भागात एमटीएनएलच्या वायरच्या चोरीच्या घटना घडत आहेत. अशाच प्रकारे घाटकोपरच्या टिळक रोड ते एम. जी. रोड परिसरात २२ एप्रिल रोजी दहा लाख रुपये किमतीची ११०० मीटर वायरची चोरी करण्यात आली होती. त्यामुळे अनेकांचे टेलिफोन आणि इंटरनेट सेवा बंद झाली. एमटीएनलच्या कर्मचाऱ्यांनी याबाबत तपास सुरू केला असता जमिनीखाली एक मीटर अंतरावरील तांब्याची वायर अज्ञात चोरांनी लंपास केल्याचे लक्षात आले.





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

## बेकायदेशीर पेस्ट कंट्रोल कामगारांना काम न देण्याचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : परवाना प्राधिकरणाद्वारे सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, किटकनाशक कायदा 1968 व किटनाशक अधिनियम 1971 मधील तरतुदींनुसार त्यांनी शहरात अनधिकृतपणे पेस्ट कंट्रोल करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांबाबत जागरूक राहावे आणि त्यांना कोणतेही काम देऊ नये. गेल्या काही दिवसांपासून असे निदर्शनास आले आहे की अनेक व्यक्ती कोणतीही अधिकृत परवानगी न घेता, तसेच आवश्यक ज्ञान आणि कौशल्याशिवाय पेस्ट कंट्रोल चे काम करत आहेत. या बेकायदेशीर कृत्यांमुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. हे अनधिकृत कामगार निकृष्ट दर्जाची आणि धोकादायक रसायने वापरण्याची शक्यता असते, ज्यामुळे विषबाधा किंवा इतर गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. या व्यतिरिक्त, अशा अनधिकृत व्यक्तीकडून फसवणूक होण्याची शक्यता देखील असते. ते अर्धवट काम करून पैसे उकळू शकतात किंवा चुकीच्या पद्धतीने उपचार करून मालमत्तेचे नुकसान करू शकतात. अधिकृत परवानाधारक पेस्ट कंट्रोल सेवा पुरवणाऱ्या कंपन्या आणि कामगार यांच्यावर शासनाचे नियंत्रण असते आणि ते विशिष्ट नियमांनुसार काम करतात. त्यांच्याकडून दिल्या जाणाऱ्या सेवा सुरक्षित आणि प्रभावी असतात.त्यामुळे, सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की कोणत्याही अनोळखी व्यक्ती किंवा संस्थेकडून पेस्ट कंट्रोल सेवा घेण्यापूर्वी, त्यांच्या अधिकृत परवान्याची आणि नोंदणीची खात्री करावी. अतिशय कमी दरात सेवा देणाऱ्या संशयास्पद व्यक्तींपासून सावध राहावे. केवळ अधिकृत आणि नोंदणीकृत पेस्ट कंट्रोल सेवा पुरवणाऱ्यांनाच आपल्या घरी किंवा आस्थापनेत काम करण्याची परवानगी द्यावी. बेकायदेशीर पेस्ट कंट्रोल करणाऱ्यांना काम देणे हे केवळ आपल्या आरोग्यासाठीच नव्हे, तर आपल्या मालमत्तेसाठी देखील धोकादायक ठरू शकते. जर आपल्या परिसरात कोणी अनधिकृतपणे पेस्ट कंट्रोल करताना आढळल्यास, तात्काळ भ्रमणध्वनी क्र. ७०३९९४४६९ व ८२०८८५५९७० वर परवाना अधिकाऱ्यास त्याची माहिती द्यावी, अशा पेस्ट कंट्रोल करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्था यांच्यावर किटकनाशक कायदा 1968 व किटनाशक अधिनियम 1971 मधील तरतुदीनुसार कार्यवाही केली जाईल, असे आवाहन परवाना अधिकारी तथा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी ठाणे यांनी केले आहे.

## अनधिकृत बॅनर पोस्टरवर धडक कारवाई



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण : कल्याण डोंबिवली परिक्षेत्रात दुर्घटना टाळण्याच्या दृष्टिकोनातून अनधिकृत होर्डिंग हटविण्याचे निर्देश कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी मान्सूनपूर्व आपत्ती व्यवस्थापन बैठकीत दिले होते. त्याअनुषंगाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिका ड प्रभागक्षेत्रात सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतपणे लावण्यात आलेल्या जाहिरात बॅनर पोस्टरवर ड प्रभागाचे सहा आयुक्त उमेश यमगर यांच्या पथकाने कठोर कारवाई केली. ड प्रभागातील काही शिक्षण संस्था व क्लासेसमार्फत महापालिकेची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता ड प्रभाग क्षेत्रात विविध ठिकाणी जाहिरात बॅनर आणि पोस्टर लावण्यात आले होते.

त्यामुळे सार्वजनिक मालमत्तेचे विद्रूपीकरण झाले असून, परिसराच्या स्वच्छतेवर तसेच नागरी सौंदर्यावर परिणाम झाला होता. ड प्रभागाच्या पथकामार्फत संबंधित बॅनर पोस्टर्स तात्काळ हटविण्यात आले आणि संबंधित 5 जाहिरातदारांविरुद्ध महाराष्ट्र मालमत्ता विरुपण प्रतिबंधक अधिनियम, 1995 च्या कलम 3 नुसार कोळशेवाडी पोलीस ठाण्यात कायदेशीर फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

तर डोंबिवलीच्या फ प्रभागातही सहा. आयुक्त हेमा मुंबरकर यांच्या पथकाने डोंबिवली पूर्व येथील कल्याण रोडवरील दोन होर्डिंग, खंबाळपाळा रस्त्यावरील दोन होर्डिंग, कांचनगाव भोईरवाडी येथील एक होर्डिंग अशा पाच होर्डिंग वर निष्कासनाची कारवाई काल दिवसभरात केली. सद्यस्थितीत अवकाळी हवामानामुळे, पत्र्याचे किंवा वाऱ्याला अडथळा ठरणारे फलक लक्षात घेता धोकादायक, अनधिकृत व परवानगी संपुष्टात आलेले होर्डीग्स, बॅनर्स संबंधितांनी स्वतःहून हटवावेत. सार्वजनिक ठिकाणी कोणतीही जाहिरात करण्यापूर्वी महानगरपालिकेची परवानगी घेणे अनिवार्य आहे. अन्यथा नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. आपले शहर स्वच्छ, सुंदर आणि विद्रूपतेच्या विळख्याबाहेर ठेवण्यासाठी महापालिकेला सहकार्य करावे असे आवाहन महापालिके मार्फत करण्यात आले आहे.

## आ.विश्वनाथ भोईर यांच्या मध्यस्तीने डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान रस्त्याचा विषय मार्गी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




कल्याण : कल्याण पश्चिम येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान बचाव समितीच्या मागणी नुसार डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान रस्ता रुंदीकरण प्रकरणात आमदार विश्वनाथ भोईर यांच्या मध्यस्तीने आयुक्त अभिनव गोयल यांनी समितीच्या मागण्या मान्य करून रस्त्याचा विषय मार्गी लावला आहे. 1992 पासून डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यानाची जागा रस्ता रुंदीकरण करण्यासाठी घेण्यात आलेली होती. अश्या प्रकारे तीन वेळा उद्यानाची जागा घेण्यात आली. त्या विरोधात डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान बचाव समितीने तीव्र आंदोलन उभे केले होते. आणि उद्यानाची जागा वाढवून द्यावी अशी मागणी सतत लावून धरली होती. स्मार्ट सिटी तर्फे आता उड्डाणपुलाचे काम सुरु करण्यात आले आहे. काम अंतिम टप्यात आहे. त्यात डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यानाची जागा बाधित होत असून रस्ता रुंदीकरण करणे आवश्यक आहे.

अनेक दिवस महापालिकेच्या आयुक्तांबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान बचाव समितीशी चर्चा बैठाका सुरु होत्या. आयुक्त डॉ विजय सूर्यवंशी, आयुक्त भाऊसाहेब दांगडे, आयुक्त इंदुराणी जाखड यांनी समिती बरोबर बैठका घेऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान वाचवण्याचे आश्वाशन दिले, तसे पत्र दिले. ठराव केला. अडचण होती बीओटी वर जागा दिलेल्या अशोका बिल्डकॉन याच्याशी सुरु असलेल्या लावदाची. लवदाचा निर्णय होत नाही तो पर्यन्त रुक्मिणीबाईची जमीन उद्यानासाठी वाढवता येत नव्हती.

या संदर्भातील तिढा सुटता सुटत नव्हता आणि स्मार्ट सिटीला रस्ता रुंदीकरण करता अडचण निर्माण होत होती. डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान हे कल्याण पश्चिम येथील महत्वाचे ठिकाण आहे. त्या उद्यानाला इतिहासिक पार्श्वभूमी आहे. उद्यान वाढवणे आवश्यक आहे. या बाबत सर्व आयुक्तानी सहकार्य करण्याची भूमिका घेतलेली होती. तीच भूमिका आयुक्त अभिनव गोयल यांनी कायम ठेवावी व लवादाचा निर्णय लागताच डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यानाची जागा वाढवून द्यावी असा मुद्दा स्थानिक आमदार विश्वनाथ भोईर यांनी मांडला त्यास आयुक्तानी मान्यता दिली.

सर्व समाज घटकानी आमदारांच्या भूमिकेचे स्वागत केले. आणि स्मार्ट सिटीच्या कामाला उद्यापासून सुरवात होईल. त्याच बरोबर डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यानाच्या कामालाही सुरवात करण्यात येईल. या बैठकीत शिवसेना जिल्हा प्रमुख अरविंद मोरे, माजी नगरसेवक गणेश जाधव, मिलिंद गायकवाड, अण्णा रोकडे, डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान बचाव समितीचे अध्यक्ष पत्रकार बाबा रामटेके, राजू रणदिवे, भीमराव डोळस, पत्रकार सुदाम गंगावणे, ऍड घनशाम गायकवाड, बाळू कांबळे, कुमार कांबळे, सुरेश जाधव, रमेश बर्वे यांनी चर्चेत भाग घेतला आणि आमदार विश्वनाथ भोईर यांचे आभार मानले.

## कामगार दिन दिवशीही कामगारांना सुट्टी नाही

### मुरबाडमधील औद्योगिक कंपनी व्यवस्थापनाचा मुजोरपणा !

### म न से सह महाराष्ट्र मजदुर संघ स्थानिक कामगारांसाठी मैदानात !

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




मुरबाड : मुरबाड औद्योगिक क्षेत्रामध्ये अनेक प्रकारच्या छोट्या -मोठ्या अनेक कंपन्या असून, बहुसंख्य कंपन्या या शासनाच्या नियमानुसार चालतात.त्यांना शासनाने घालून दिलेले निर्बंध, व नियमानुसार त्यांचा कारभार चालत असतो, मात्र याच औद्योगिक क्षेत्रात असलेली क्रिपाशक्ती बेकर्स, परमेश्वर बेकर्स व पार्ले बिस्कीट कंपनी हि शासनाचे नियम धाब्यावर बसुन चालत असुन, येथे प्रामुख्याने कामगार वर्ग हा येथील बहुतांश गोरगरीब,गरजु, निराधार, पिडीत महिला या ठिकाणी काम करत असल्याने येथील मॅनेजमेंट हि जाणुन बुजुन या महिलांवर सातत्याने अन्याय अत्याचार करत आहेत .त्यांच्या कडून आठ तास ड्युटी ऐवजी दहा दहा तास ,बारा तास, जबरदस्तीने ड्युटी करून घेत असुन नुकताच पार पडलेला 1 मे हा कामगारांच्या हक्काचा दिवस,हा कामगार दिन, म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजनातुन साजरा केला जातो.किमान या दिवशी तरी येथील कामगारांना भर पगारी सुट्टी मिळणे आवश्यक असताना, येथील व्यवस्थापनाने जोर जबरदस्तीने येथील महिला कामगारांना कामावर न आल्यास कामावरून काढु अशी धमकी देऊन, त्यांना कामगार दिनाच्या दिवशीही वेठबिगाराप्रमाणे राबविण्यात आले.याशिवाय या कामगारांना वर्ष भरात येणाऱ्या कुठल्याच प्रकारच्या सणासुदीच्या दिवशी भरपगारी सुट्टी मिळत नाही . एरव्ही कधी सुट्टी घेतल्यास,युनियनबाजी केल्यास कामावरून काढून टाकण्याची धमकी दिली जाते.तसेच आठतासा ऐवजी दहा, बारा तास ड्युटी करून घेतली जाते.त्याच्या मोबदल्यात कुठल्याही प्रकारचे किमान वेतन न देता,मोघमपणे अडीच तिनशे रुपये देवून त्यांची बोलवण केली जात आहे.तर त्या व्यतिरीक्त कुठल्याही सोयीसुविधा दिल्या जात नाहीत.ना सी.एल,एस.एल.ना पी.एल.ना घरभाडे,ना बोनस,ना युनिफॉर्म,ना शेट्टी किट,दिले जात. याशिवाय या कंपन्या मध्ये एकही मराठी किंवा महाराष्ट्रीयन पुरुष कामगार नसुन, सर्व परप्रांतीय पुरुष,व फक्त मराठी महिला वर्ग येथे आपल्या मंजुरी मुळे हव्या तशा पद्धतीने राबविला जातो. प्रशासन या पिडीत , अन्याय, अत्याचार ग्रस्त महिलांना न्याय देईल काय ?अशी मागणी महाराष्ट्र मजदुर संघाचे ठाणे जिल्हा सरचिटणीस मा.श्री.मंगलजी डोंगरे यांनी केली आहे.तसेच लवकरच कामगार उपायुक्त यांची भेट घेऊन या पारले कंपनीला धडा शिकवला जाईल.तर दुसरीकडे परमेश्वर बेकर्स या पार्ले बिस्कीट बनविणा-या कंपनी मध्ये हि असाच प्रकार सुरु असताना मनसेचे मुरबाड शहर अध्यक्ष देवेंद्र जाधव यांनी अचानक या कंपनीला भेट दिली असता.त्या कंपनीचा ही मुजोरपणा नजरेसमोर आला असून,तिथला कामगार वर्ग काकुळतीला येऊन सुद्धा तिथल्या मुजोर व्यवस्थापनानी कामगार दिनाचे कुठलेही सोयरसुतक न ठेवता. कामगाराना ड्युटी करण्यास भाग पाडल्याचे दिसून आले.त्यानंतर मनसे स्टाईलने व्यवस्थापला जबाब देऊ म्हटल्यावर तिथल्या मॅनेजरने समजुतीने कामगारांना भरपगारी सुट्टी देण्याचे कबूल केले. तर या ठिकाणी काम करणाऱ्या पिडीत, शोषित, महिलांना न्याय देण्यासाठी मुरबाड मनसे व महाराष्ट्र मजदुर संघ आता मैदानात उतरणार हि काळ्या दगडावरची रेष असल्याचे या पार्ले ग्रुप ऑफ कंपनीला सांगण्यात आल्याने कंपनी व्यवस्थापनाचे धाबे दणाणले आहे.

## संकेत खर्डीकरांच्या पुस्तकास विशेष पुरस्कार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कै. स्मितानाई गुरुप्रसाद देशपांडे स्मृतीमंच आणि बल्लाळ बोबडे शैक्षणिक संस्थेच्या विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या २०२४-२५ सर्वोत्कृष्ट पुस्तक पुरस्कार बालसाहित्य संकीर्ण विभागामध्ये परदेशी भाषा तज्ञ व खर्डीकर शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार ॲड संकेत खर्डीकर यांच्या 'आत्मविश्वास यशाचा पाया' या पुस्तकास कै स्मिता देशपांडे स्मृती पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. नाशिक येथील आमदार सीमा हिरे यांच्या हस्ते हा पुरस्कार वितरण समारंभ पार पडला. या प्रसंगी व्यासपीठावर नगरसेवक श्याम बडोदे, अजिंक्य साने, शिक्षण सेवाव्रती हेरंब गोविलकर, बल्लाळ बोबडे क्लासेसचे संस्थापक प्रा. अविनाश बल्लाळ, प्रकाशक दिलीप व दिपाली बल्लाळ, ज्येष्ठ पत्रकार गुरुप्रसाद देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते. पुस्तकाचे लेखक संकेत खर्डीकर हे



दूरदृष्टी असलेले युवा व्यक्तिमत्त्व असून ते एक उत्तम शिक्षणतज्ञ, कुशल उद्योजक आणि समाजसेवक आहेत. शैक्षणिक क्षेत्रात नव्या संकल्पना रुजवून विद्यार्थ्यांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण व्हावा यादृष्टीने त्यांनी हे नवे पुस्तक लिहले असून पुस्तकास सर्वोत्कृष्ट साहित्य पुरस्कार देखील प्राप्त झाला आहे. हे पुस्तक विद्यार्थ्यांच्या जडणघडणीसाठी प्रेरणादायी देखील ठरत आहे. विविध क्षेत्रातील अशाच सुप्त कामगिरीबद्दल संकेत खर्डीकर यांस आतापर्यंत विविध पुरस्कार मिळाले आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील त्यांनी आपला नावलौकिक केला असून जर्मन भाषा शिक्षण आणि सांस्कृतिक आदान प्रदान क्षेत्रातील कार्याची पावती म्हणून एका जर्मन वृत्तपत्राने देखील त्यांची मुलाखत केली होती. नामांकित खर्डीकर क्लासेसचे ते व्यवस्थापकीय संचालक असून उत्तमरीत्या कामकाज पाहत आहेत. शिक्षण म्हणजे यशाचा महामार्ग आहे. माझे वडील डॉ.सुनील खर्डीकर यांनी याच महामार्गावर चालण्याचे मार्गदर्शन मला लहानपणा पासूनच दिले आहे. आता हाच मार्ग ज्यांना अवघड वाटतो त्यांच्यात आत्मविश्वास वाढविणे हे मला गरजेचे वाटले. त्यातूनच या साहित्याचा जन्म झाला आणि मी हे पुस्तक लिहले अशा भावना यावेळी लेखक संकेत खर्डीकर यांनी व्यक्त केल्या.

## स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर जांभूळपाडा येथे रस्ता



### रहिवाश्यांची कसरत व पायपीट थांबली तहसीलदार व आमदारांनी गैरसोय दूर केली

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /शहापुर : स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतर तहसीलदार परमेश्वर कासुळे यांच्या प्रयत्नाने आमदार दौलत दरोडा यांच्या निधीतून जांभूळ पाडा ते आवरे यांना जोडणारा कॉंक्रीट रस्ता नुकताच करण्यांत आला.या रस्ताचा लोकार्पण सोहळयाचे उदघाटन तहसीलदार परमेश्वर कासुळे व आमदार दौलत दरोडा यांच्या हस्ते करण्यात आले.

आवरे ग्रुप ग्राप हद्दीतील जांभुळपाडा ह्या आदिवासी पाड्यात येण्या-जाण्यासाठी रस्ताच नसल्याने येथील आदिवासी बांधवांना तालुक्याचे ठिकाण गाठण्यासाठी रोज दगड-धोंडे,चिखल व खाच खळग्यातून कसरत करून ये-जा करावी लागत होती. येथील जिप शिक्षक धीरज डोंगरे यांनी येथील रस्त्याच्या तांत्रिक अडचणीबाबत तहसीलदार परमेश्वर कासुळे यांना सांगितले.तहसीलदार परमेश्वर कासुळे यांनी येथील गैरसोय बघता येथील शेतकऱ्यांची जमिनीबाबत असलेली तांत्रिक अडचण दूर करून आमदार दौलत दरोडा यांच्याशी संपर्क करून येथे रस्ता बनवण्यासाठी सूचना केली. याबाबत आमदार दौलत दरोडा यांनी येथील रस्त्याला 20 लाख रुपयांचा निधी मंजूर करून आवरे -जांभुळपाडा कॉंक्रीट रस्ता करून घेतला.रस्ता झाल्याने आता येथील रहिवाश्यांची पायपीट वाचणार असून वाहनांची रेलचेल सुरू होणार असल्याने येथील रहिवाशी समाधान व्यक्त करीत आहेत.यावेळीतहसीलदार परमेश्वर कासुळे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष डॉ.मनोहर सासे, शिक्षक धीरज डोंगरे,जगदीश पवार,अविनाश किरपण,संजय सुरळके, सरपंच सोमनाथ वाघ,उपसरपंच अंजना घरत,अशोक घरत,संदिप किरपण,दत्ता हिंदोळे, गुलाब भले,सखाराम शिंगे,मंगळ कडव व मोठ्यासंख्येने परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## गॅस पाईपलाईनसाठी खोदकाम नागरिक त्रस्त

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



डोंबिवली : शहरात महानगर गॅस कंपनीच्या माध्यमातून पाईपद्वारे गॅस धारकांना गॅस वितरण करण्याची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. यासाठी कंपनी रस्तोरस्ती गॅस पाईप टाकण्याचे काम सुरु आहे. या कामाकरता रस्त्यात खोदकाम होत आहे. मात्र हे सुरू असताना खड्डे बुजविण्याचे काम अर्धवट अवस्थेत असून याचा त्रास सामान्य नागरिकांना होत आहे. या खड्यात पडून नागरिक व वाहनचालक जखमी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पूर्वेकडील रहदारीच्या रॉकेलडेपो चौकात एकनाथ म्हात्रे नगर गेट समोर गॅसपाईप कामामुळे खड्डे खणले आहेत. जेष्ठ नागरिक, महिला व मुले या खड्यातून पडून जखमी होत आहेत. याशिवाय परिसरातील वाहने या खड्यात अडकून पडल्याने अपघात होण्याची शक्यता नकरता येत नाही. महावितरण कंपनीने अशा प्रकारे होणाऱ्या खड्डे बुजविण्यासाठीचा भरणा पालिका प्रशासनाकडे सुपूर्द केल्याचे महानगर गॅस कंपनीचे अधिकारी सांगत असून खड्डे बुजविणे ही पालिकेची जबाबदारी आहे असे सांगून हात झटकत आहेत. मात्र अशा दोन प्रशासनाच्या कात्रीत अडकून सामान्य नागरिकांना झगडावे लागत आहे. पालिका प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे अशी मागणी करदाते डोंबिवलिकर नागरिक करीत आहेत. याबाबत शिवसेना कल्याण ग्रामीण तालुका प्रमुख तथा माजी नगरसेवक महेश पाटील यांनी महानगर गॅस अधिकाऱ्यांना याविषयी जाब विचारुन लोकांच्या जीवाशी खेळू नका असा इशारा दिला आहे.

## शासनाचा संच मान्यता शासन निर्णय रद्द करा

### महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेची मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता




कल्याण : इंग्रजी माध्यमाच्या शाळांना सरसकट मान्यता दिल्यामुळे मराठी सह इतर माध्यमाच्या शाळांना विद्यार्थी पटसंख्येमुळे दिवसेंदिवस गंभीर परिणामांना सामोरे जावे लागत आहे. याच्यातच 15 मार्च 2024 च्या शासन निर्णयामुळे संपूर्ण महाराष्ट्रात 25 ते 30 टक्के शाळा बंद पडत असल्यामुळे हजारो कर्मचारी अतिरिक्त ठरत आहेत फक्त ठाणे जिल्ह्यातच 42 शाळा बंद पडत आहेत. या शासन निर्णयाच्या विरोधात महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने राज्यस्तरीय आंदोलनाला सुरुवात केली आहे. 15 मार्च 2024 चा शासन निर्णय रद्द करून प्रत्येक वर्गात 15 ते 20 पटसंख्या असलेला सुधारित शासन निर्णय काढा अशी परिषदेची मागणी आहे.

सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड नंतर ठाणे शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या बाहेर भारत पाक हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर नुकतेच प्रातिनिधिक स्वरूपात शिक्षक परिषदेचे राज्य अध्यक्ष वेणूनाथ कडू, कोकण विभाग अध्यक्ष गुलाबराव पाटील, राज्य कार्याध्यक्ष एकनाथ दळवी, कोकण विभाग उपाध्यक्ष हेमलता मुनोत, राज्य कार्यालय मंत्री निरंजन गिरी व इतर पदाधिकारी अरुण निळे, भुवनेश कुंभार, सुहास गायकवाड,विनोद कुंभार, शशिकांत ठाकरे व देवराज राहुल व इतर शिक्षक सहभागी होत आंदोलन केले. शिक्षण अधिकारी ललिता दहितूले यांनी निवेदन स्वीकारत त्यांच्या मार्फत मुख्यमंत्री, शिक्षण मंत्री व शिक्षण सचिव यांना निवेदन पाठवण्यात आले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी अ‍ॅण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४१११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

## सापगावातील त्या कुटूंबाला जिजाऊची आर्थिक मदत



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापुर : शहापुर तालुक्यातील सापगावात मंगळवारी (6 मे)दुपारच्या सुमारास राहुल देसले,संजय देसले व नंदू देसले यांच्या घराला विजेचा शॉर्टसर्किट झाल्याने घराला आग लागली होती. या आगीत देसले कुटूंबियांच्या घरातील सर्व गरजेच्या साहित्याचे व किराणा मालाची जळून राख झाली होती त्यात छप्पर पूर्ण जळून गेल्याने डोक्यावरील छप्पर गेले आहे तर त्यांचं स्वस्त धान्य दुकानातील धान्यही जळून गेले. सद्या रोज अवकाळी पावसाने हैराण केले असल्याने ह्या कुटुंबावर बेघर होण्याची पाळी आली आहे.जिजाऊ संस्थेचे अध्यक्ष निलेश सांबरे यांच्यावतीने सुनिल लकडे यांच्या हस्ते राहुल देसले यांच्या आईकडे रोख आर्थिक मदत देऊन माणुसकी जिवंत असल्याचे दाखवून दिले ह्या कुटुंबाच्या घराची राख रांगोळी झाल्याने शासनाने तात्काळ मदत करावी अशी मागणी यावेळी जिजाऊचे सुनिल लकडे यांनी केली.यावेळी अनिल कांबळे, नरेश जाधव यांच्यासह परिसरातील मान्यवर उपस्थित होते.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Registration No. THC/256/2022-2024